कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली संतती प्रतिबंधाक शास्त्रक्रिया करून घेणाऱ्या औद्योगिक व औद्योगिकेतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष नैमित्तीक रजा देण्यां बाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक एलव्हीई-१४८०/सीआर-१३९९/एसईआर-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जुलै १९८१.

पहा:- १] शासकीय परिपत्रक, वित्त विभाग क्र. एलव्हीई-१४५९/८५११/एस-५ दिनांक ९.२.१९६०.

२] शासकीय निर्णय, वित्त विभाग क्रमांक एलव्हीई-१४६६/२६९४/६६-१० दिनांक १२.६.६७.

३] शा.प.वि.वि.क्र. एलव्हीई/१४६८/२४२६/६८-१०, दिनांक २४.३.६९

४] शा.नि.वि वि.क्र. एलव्हीई/१४७१/३०५८/७१/एस-२, दिनांक १४.६.७२

५] शा.नि.वि.वि.क्र. एलव्हीई-१४७३/२८२६/एस-२, दिनांक १०.१०.७३.

६] शा.नि.वि.वि.क्र. एलव्हीई-१४७६/२२२/७६/एसईआर/९, दिन. ५.८.७६.

७] शा.नि.वि.वि.क्र. एलव्हीई-१४७८/सीआर×४४२/७८/एसईआर-९ दि. २७.१०.१९७८.

__निर्णय__ :-राज्य शासकीय कर्मचाऱ्यानीं [औद्योगिक व औद्योगिकेतर]छोटया कुटुंब पध्दतीचा अधिक प्रमाणांत अवलंब करण्यासाठी, जे कर्मचारी संततीप्रतिबंधाक शास्त्रक्रिया करून घेतील त्यांना वर उद्धृत केलेल्या आदेशामध्यें विशेष नैमित्तिक रजा देण्यांची तरतूद यापूर्वीच करण्यांत आलेली आहे. याबाबतीत अधिक उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें सध्या अस्तित्वात असलेल्या तरतूदी अधीक शिथिल करण्याचाप्रश्न शासनाच्या विचाराधिन होता. आता वर नमुद केलेलेसर्व आदेश रद्द करून शासन असे आदेश देत आहे की, कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली राज्य शासकीय कर्मचाऱ्याना [औद्योगिक व औद्योगिकेतर]पुढील परिच्छेदात नमुद केल्या प्रमाणे विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी.

२. कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली जे पुरुष शासकीय कर्मचारी नसबंदी शास्त्रक्रिया करून घेतील त्यांना जास्तीत जास्त सहा कामाच्या दिवसाईतकी विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी. जर एखादया कर्मचाऱ्यानें पहिली शास्त्रक्रिया निरुपयोगी ठरल्यास दुसऱ्यांदा नसबंदी शास्त्रक्रिया करून घेतली व त्याने पहिली शास्त्रक्रिया निरुपयोगी ठरल्यामुळे दुसरी शास्त्रक्रिया...

दिवसांची नैमित्तीक रजा देण्यांत यावी.

३] [अ] ज्या महिला शासकीय कर्मचारी संतती प्रतिबंधाक शास्त्राक्रिया [प्रसुती नंतर किंवा प्रसुती व्यतिरिक्त इतर वेळी] करून घेतील त्यांना १४ दिवसां पेक्षा अधिक नसेल एवढी विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी.

[ब] ज्या महिला शासकीय कर्मचारी गर्भाशयांतर्गत संतती प्रतिबंधाक [लुप] बसून घेतील त्यांना त्या दिवशी विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी.

[क] ज्या महिला शासकीय कर्मचारी कायदेशीर गर्भपाता नंतर संतती प्रति--बंधाक शास्त्राक्रिया करून घेतील त्यांना जास्तीत जास्त १४ दिवसां पेक्षा अधिक नसेल एवढी विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी.

४. [अ] ज्या शासकीय पुरुष कर्मचा-यांच्या पत्नी, पहिली शास्त्राक्रिया निरुप--योगी ठरल्यामुळें कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली दुसरी संतती प्रतिबंधाक शास्त्राक्रिया [प्रसुती नंतर किंवा प्रसुती व्यतिरिक्त इतर वेळी] करून घेतील त्यांना त्यांच्या पत्नीची पहिली शास्त्राक्रिया निरुपयोगी ठरल्यामुळे दुसरी शास्त्राक्रिया करावी लागली असे वैद्यकिय प्रमाणपत्रा सादर केल्यास ७ दिवसांची विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी. पत्नीची देखाभाल करण्यांसाठी ज्या शासकीय कर्मचा-यांची उपस्थिती आवश्यक आहे अशा प्रकारचा उल्लेख प्रमाणपत्रामध्यें असण्याची आवश्यकता नाही.

[ब] शासकीय पुरुष कर्मचा-यांच्या पत्नी कायदेशीर गर्भपातानंतर संतती प्रतिबंधाक शास्त्राक्रिया [प्रसुतीनंतर किंवा प्रसुती व्यतिरिक्त इतरवेळी] करून घेतील त्यांच्यापत्नीनी गर्भपाता नंतर संतती प्रतिबंधाक शास्त्राक्रिया करून घेतल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्रा सादर केल्यास त्यांना ७ दिवसा पर्यंत विशेष नैमित्तीक रजा देण्यांत यावी. पत्नीची देखाभाल करण्यांसाठी त्या शासकीय कर्मचा-याची उपस्थिती आवश्यक आहे अशा प्रकारचा उल्लेख प्रमाणपत्रामध्यें असण्याची आवश्यकता नाही.

५. निर्बिजीकरण शास्त्राक्रिया केलेल्या कर्मचा-यांला शास्त्राक्रिये नंतर गुंतागुंत उद्भावल्यामुळें विहीत मर्यादेपक्षा जास्त विशेष नैमित्तीक रजेची आवश्यकता असेल तर, संबंधित रूग्णालयाच्या प्राधिका-याचे/ प्राधिकृत वैद्यकिय अधिका-याचे प्रमा--णपत्रा सादर केल्यास त्यांला किंवा तिला जेवढा काळ पर्यंत शास्त्राक्रिये नंतरच्या गुंतागुंतीमुळे रूग्णालयात राहावे लागले असेल तेवढया काळासाठी विशेष नैमित्तीक रजा देण्यात यावी. याशिवाय निर्बिजीकरण शास्त्राक्रिये नंतर ज्यांना रूग्णालयात रहावे लागणार नाही परंतु त्याचवेळी कामावर जाण्यास जे समर्थ नाहीत त्यांना, संबंधित रूग्णालयातील योग्य असा प्राधिकारी किंवा प्राधिकृत वैद्यकिय अधिका-याचे वैद्यकीय प्रमाणपत्रा सादर केल्यास पुरुषांच्या संततीप्रतिबंधाक शास्त्राक्रियेसाठी

७ दिवस व महिलांच्या संततीप्रतिबंधाक शस्त्रक्रियेसाठी १४ दिवस विशेषा नैमित्तीक रजा देण्यात यावी.

६. जे शासकीय कर्मचारी पुन:संयोजन शस्त्रक्रिया [री-कॅनलायझेशन] करून घेतील त्यांना २१ किंवा रूग्णालयांत रहाण्यासंबंधी प्राधिकृत वैद्यकिय अधिका--यानें प्रमाणित केलेला प्रत्यक्षा कालावधी, यापैकी जो कालावधी कमी असेल, तेवढया कालावधी एवढी नैमित्तीक रजा देण्यांत यावी. शिवाय, ही शस्त्रक्रिया करून घेणेसाठी जाण्यायेण्यामध्यें जो प्रत्यक्षा कालावधी लागेल त्यासाठी सुध्दा विशेषा नैमित्तीक रजा देण्यात यावी. पुन:संयोजन शस्त्रक्रियेसाठी देण्यांत येणारी विशेषा नैमित्तीक रजा [वैद्यकिय खर्चाच्याप्रतिपूर्तीची कोणतीही जबाबदारी न घेता] पुढील अटीच्या आधीन राहील.

१] ती शस्त्रक्रिया, पुन:संयाजन शस्त्रक्रिया करण्याच्या सोई असलेले रग्णा--लयं, वैद्यकिय महाविद्यालय किंवा संस्था येथेच केलेली असावी.

२] विशेषा नैमित्तीक रजेच्या अर्जासोबत, ज्या वैद्यकिय अधिका-याने संबंधित शस्त्रक्रिया केली असेल त्याचे, प्रमाणपत्रात नमूद केलेल्या काला--वधीसाठी त्या कर्मचा-याने, शस्त्रक्रियेच्या कालामध्यें व शस्त्रक्रिये नंतर बरे होण्यासाठी रूग्णालयात राहणे आवश्यक आहेत, अशा प्रकारचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

वरील सवलत पुढील शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय असेल:-

[१] अविवाहित कर्मचारी किंवा

[२] ज्यांना दोनपक्षा कमी मुले आहेत असे कर्मचारी किंवा

[३] जे पुन:संयोजन शस्त्रक्रिया महत्वाच्या कारणासाठी करु इच्छितात, असे कर्मचारी उदा. संततीप्रतिबंधाक शस्त्रक्रियेनंतर एखाद्या कर्मचा--याची सर्व मुले किंवा मुला मरण पावली असतील.

७. निर्बिजीकरण व पुन:संयोजन शस्त्रक्रिया यासाठी मिळणारी विशेषा नैमित्तीक रजा नेहमीच्या रजेला मागे जोडून घेता येईल. परंतु ती नैमित्तीक रजा किंवा नेहमीच्या रजेला पुढे जाडून घेता येणार नाहीं.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व त्यांच्या नावाने.

व्यं. दे. पानसे

उप सचिव, वित्त विभाग